## Expert Lecture

On 28th February 2023 Science week starts with expert lecture of Prof. C.U. Naikwade. Expert talks were organised through the week where experts spoke about the **power of science & invention**.

We would like to thank the Experts who joined us in the celebration and shared valuable information with the students. During his talk, he explained the importance of **Scientific View**. The speaker concluded by explaining the future research possibilities and also discussed about the various internship projects that students after the talk, an interactive session was held where the guest had patiently attended and answered each and every question. At the end of it, the higher authority congratulated all the prize-winners.









**Expert talks were organised through the week where expert Prof. C.U. Naikwade spoke about the power of science & invention.**

## SCIENCE DAY NEWS

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढणे गरजेचे



चांदोरी येथील के. के. वाघ महाविद्यालयात विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. चंद्रकांत नाईकवाडे.

**चांदोरी महाविद्यालयात प्रा. चंद्रकांत नाईकवाडे याचे प्रतिपादन**

प्रतिनिधी सायखेडा

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अनेक कलागुण असतात ते त्यांनी विकसित केले पाहिजे. आपल्याकडे जे काही उपलब्ध आहे त्याचा फायदा आपण नेहमी केला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. चंद्रकांत नाईकवाडे यांनी केले.

के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय चांदोरी येथे विज्ञान व संगणक विज्ञान विभागांतर्गत विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. दातीर, कला विभागप्रमुख डॉ. एच. टी. वाघमारे, संगणक विभागप्रमुख प्रा. बी. बी. चौधरी, विज्ञान विभागप्रमुख प्रा. एस. एस. बकरे, प्रा. एस. बी. भालेराव, प्रा. एन. जे. देशमुख, प्रा. एस. एस. जाधव आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. दातीर यांनी प्रास्ताविकात ग्रामीण भागातील विद्यार्थी होतकरू असतात. त्यांना शिकण्याची जिज्ञासा असते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच इतर गुण देखील अंगीकारले पाहिजे व महाविद्यालयातून परिपूर्ण होऊन बाहेर पडावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. आर. एस. कडाळे यांनी केले. प्रा. ए. आर. गायकवाड यांनी आभार मानले.

# चांदोरी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा

**सायखेडा :** के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय चांदोरी येथे विज्ञान व संगणक विज्ञान विभागांतर्गत मंगळवारी (दि. २८) विज्ञान दिन साजरा झाला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. चंद्रकांत नाईकवाडे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. आर. के. दातीर, डॉ. एच. टी. वाघमारे, प्रा. बी. बी. चौधरी, विज्ञान विभागप्रमुख प्रा. एस. एस. बकरे, प्रा. एस. बी. भालेराव, प्रा. एन. जे. देशमुख, प्रा. एस. एस. जाधव आदी उपस्थित होते. प्रा. आर. एस. कडाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. आर. गायकवाड यांनी आभार केले.

**दिव्य मराठी**

**Divya Marathi News Paper**

**पुढारी**

**Pudhari News Paper**

Karmaveer Kakasaheb Wagh Arts, Commerce, Science and Computer Science College
CHANDORI. Tal.Niphad, Dist.Nashik 422 201